**दिनांक २९ मे, २०१० रोजी सायं.५.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन, जळगांव येथे संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.**

---

सभेस उपस्थित असलेल्या सर्व उपस्थितांची नोंद नोंदवहीत घेण्यांत आली आहे.

सर्वप्रथम सर्व उपस्थितांचे स्वागत करून प्र.महाव्यवस्थापक, जिउकें, जळगांव यांनी मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली. खालील विषयांवर/ मुद्यांवर सभेत सविस्तर चर्चा होवून आवश्यक निर्णय घेण्यांत आले. सभेत चर्चा झाल्यानंतर त्यावर संबंधीत यंत्रणेने /विभागाने /संस्थेने इतिवृत्ताची वाट न बघता त्वरीत कार्यवाही करावयाची आहे असे मा.अध्यक्षांनी सभेत सांगितले.

**विषय क्र.१:- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे:-**

मागील दिनांक २८ एप्रिल,२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्तावर कोणाही सभासदाकडून काहीही हरकत नसल्याने इतिवृत्त वाचून कायम करण्यांत आले.

**विषय क्र.२:- इतिवृत्तावरील केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे :-**

**१) जळगांव शहर महानगरपालिका संबंधीत औद्योगिक संघटनांचे विविध प्रश्न:-**

औद्योगिक क्षेत्रातील महावितरणच्या सबस्टेशन जवळील टॉवरलाईन खालून जाणा-या रस्त्याचे दोन्ही बाजूस रस्ता आणखी खाली करून त्यचे उतार दोन्ही बाजूस साधारणतः १५ ते २० मी.पर्यन्त वाढविण्याचे कामाच्या निविदा काढण्यात आल्याचे उपायुक्त, जळगांव शहर महानगरपालिका यांनी सभेत सांगितले होते व त्यानुसार सदर काम हे १० मे,२०१० पर्यन्त पुर्ण करण्याचे मा.अध्यक्षांनी सूचीत केले होते. यावर सभेत विचारणा केली असता अद्याप काम पुर्ण झाले नसल्याचे उपायुक्त जळगांव शहर महानगरपालिका यांनी सभेत सांगितले. याविषयी मा.अध्यक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली व हे काम पाउस पडण्याच्या अगोदर पुर्ण करणेस संबंधीत मक्तेदारास सूचीत करावे असे आदेश दिले.

**कार्यवाही - मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका**

**२) धुळे येथील एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता कार्यालय जळगांव येथे हलविणे बाबत:-**

जळगांव येथे स्वतंत्र कार्यकारी अभियंता, एमआयडीसी यांचे कार्यालय सुरू करणेबाबत महामंडळाच्या संचालक मंडळाचे सभेत सदर विषय घेणेसाठी कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, धुळे यांनी पाठपुरावा करावा असे ठरले.

**कार्यवाही - कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे**

**३) एमआयडीसीने औद्योगिक क्षेत्रासाठी नवीन अग्निशमन केंद्राची तरतूद करणे:-**

सध्या महानगरपालिका, जळगांव यांचेकडे असलेले अग्निशमन केंद्र परत घेणेबाबत मुख्यालय स्तरावर विचार सुरू असून संचालक मंडळाचे बैठकीपुढे सदरचा विषय निर्णयासाठी ठेवणेत आलेला आहे. कार्यकारी अधिकारी, मऔविम, धुळे यांनी याविषयी पाठपुरावा करावा असे ठरले.

**कार्यवाही - कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे.**

**४) विद्यूत वितरण कंपनी संबंधातील विविध प्रश्न**

एमआयडीसी कडून उद्योग घटकांना जो पाणी पुरवठा करण्यात येतो त्यासाठी विद्यूत वितरण कंपनीने जादा वीज बीलाची मागणी एमआयडीसी कडे केल्याने परिणामी औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकांचे पाण्याचे बील वाढणार आहे. याविषयी मागील सभेत ठरल्याप्रमाणे दिनांक ३ मे,२०१० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात अधिक्षक अभियंता, एमआयडीसी, मुंबई, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, धुळे, महावितरण कंपनीचे जळगांव येथील मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व औद्योगिक संघटनेचे प्रतिनिधी यांची संयुक्त सभा घेण्यांत आली व महावितरण कंपनीने एमआयडीसीकडून व्यापारी ऐवजी औद्योगिक दराने वीज बील वसूल करण्यात यावे असे ठरले असून त्याप्रमाणे महावितरण कंपनीने कार्यवाही करावी म्हणून सूचीत करण्यांत आले.

**कार्यवाही - अधिक्षक अभियंता, महावितरण कंपनी लि.जळगांव.**

**५) मे.भास्कर फुडस्, एमआयडीसी जळगांव या घटकाचे समस्येबाबतः-**

खान्देश ग्राईंडींग या उद्योग घटकाचा प्लॉट क्रमांक डी-४५/२ गेल्या तीस वर्षांपासून रिकामा आहे. सदर प्लॉट परत घेण्याबाबत घटकास नोटीस दिली होती.त्यावर सदर घटकाने मुख्य कार्यालय, एमआयडीसी, मुंबई यांचेशी पत्रव्यवहार सुरू असू पुढील कार्यवाही मुख्यालय स्तरावर प्रलंबित आहे. याविषयी पाठपुरावा सुरू ठेवावा असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

**कार्यवाही - प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक**

**६) नव्याने होवू घातलेल्या व्ही-सेक्टर सबस्टेशनमधून औद्योगिक फिडरशिवाय अन्य कोणताही फिडर न काढणे बाबत..**

मागील सभेत ठरल्याप्रमाणे या विषयावर दिनांक ३/५/२०१० रोजी झालेल्या सभेत चर्चा झाली असता, व्ही सेक्टर सबस्टेशनमध्ये एकुण ६ फिडर असून त्यापैकी फक्त १ फिडर ग्रामिणसाठी असून त्यास स्वतंत्र Bay and Breakers System असल्याने त्याचा बाकीचे फिडरवर कोणताही परिणाम होणार नाही असे मुख्य अभियंता, महावितरण कंपनी लि. यांनी सांगितले. त्यामुळे हा विषय पुढील सभेत घेवू नये असे सर्वानुमते ठरले.

**७) मे.आशापुरी मॅन्युफॅक्चरर्स, ४७, औद्योगिक वसाहत, पाचोरा, जि.जळगांव. - यांना इंडस्ट्रीयल विजपुरवठा मिळणे बाबत..**

सदर उद्योजकाने सन १९९० पासून उद्योगघटक सुरू केलेला असून त्यांना कमर्शिअल कॅटेगरीचे विज कनेक्शन दिलेले आहे व ग्रामिण भागातील पोलवरून विजपुवठा जोडलेला आहे त्याऐवजी इंडस्ट्रीयल कनेक्शन देवून अखंडीत विज पुरवठा करावा म्हणून विनंती केलेली आहे. याविषयी मागील सभेत ठरल्याप्रमाणे दिनांक ३/५/२०१० रोजी झालेल्या सभेत चर्चा करण्यांत आली व याविषयी दोन लोकांची समिती नेमून चौकशी केली जाईल व त्यांचा अहवाल आल्यानंतर निर्णय घेण्यात येईल असे मुख्य अभियंता, महावितरण कंपनी लि.यांनी सभेत सांगितले. त्यानुसार सभेत विचारणा केली असता सदर घटकाने योग्य त्या कागदपत्रांसह अधिक्षक अभियंता यांचेकडे अर्ज करावा व त्यानंतर कागदपत्र व प्रत्यक्ष तपासी केली जाईल व योग्य तो निर्णय घेतला जाईल असे अधिक्षक अभियंता, महावितरण कंपनी लि. यांनी सभेत

सांगितले. यावर सभेत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी संबंधीत यंत्रणेकडून त्वरीत करण्यांत यावी अशी सूचना मा.अध्यक्षांनी केली.

**कार्यवाही - मा.अधिक्षक अभियंता, म.रा.विद्यूत वितरण कंपनी लि.जळगांव.**

**विषय क्र.३:- सभेपुढे आलेले नवीन विषयः-**

**१) चाळीसगांव सहकारी औद्योगिक वसाहतीमधील रस्ते दुरूस्त करणे, पथदिप बसविणे व संस्थेच्या आवारात वृक्ष लागवड करणे बाबत..**

हा विषय मागे जिल्हा उद्योग मित्र समिती सभेत चर्चिला गेला होता व त्यावर मुख्याधिकारी, नगरपालिका यांना त्वरीत संस्थेच्या समस्या सोडविणेबाबत मा.अध्यक्षांनी सूचीत केले होते. परंतू आजपावेतो नगरपालिका,चाळीसगांव यांनी कार्यवाही केलेली नसल्याचे संस्थेने कळविले आहे. याविषयी मुख्याधिकारी, नगरपालिका, चाळीसगांव यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागवावा व पुढील सभेस त्यांनी सभेस उपस्थित रहावे म्हणून कळविण्यात यावे असे आदेश मा.अध्यक्षांनी सभेत दिले.

**२) जळगांव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपाबाबतः-**

एम सेक्टर उद्योजक चॅरीटेबल ट्रस्ट, जळगांव यांनी कळविले आहे की, जळगांव औद्योगिक क्षेत्रात भूखंड वाटपास उपलब्ध होणार असल्यामुळे काही भूखंड मागणी धारकांनी भूखंडासाठी एमआयडीसी कार्यालय, जळगांव येथे अर्ज करून आपले नांव निश्चित करण्याचे प्रयत्न चालविले आहे. भूखंड वाटपास उपलब्ध झाल्यानंतर त्याबद्दलची माहिती वर्तमानपत्रे व इतर माध्यमातून जाहिरात देवून कळवावे व त्यानंतरच भूखंड वाटपाची प्रक्रिया सुरू करावी. यावर सभेत एमआयडीसीचे क्षेत्र अधिकारी यांना विचारणा केली असता, मुख्यालयाकडून आलेल्या अर्जांची जेष्ठता सूची ठेवण्याचे आदेश असल्याने सदरचे अर्ज स्विकारल्याचे सभेत सांगितले. याविषयी औद्योगिक संघटनेच्या पत्राची प्रत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी, मुंबई यांना पाठवून यावर त्वरीत योग्य ती कार्यवाही करणेविषयी कळविण्यात यावे असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

**विषय क्र.४ :- मा.अध्यक्षांचे परवानगीने आलेले आयत्या वेळचे विषयः-**

**१) तापी नदिचे पाणी प्रदुषणाबाबत**

भुसावळ येथे तापी नदिचे पात्रात विद्यूत निर्मितीची राख सोडली जात असल्याने नदीचे पाणी प्रदुषित झाले आहे व त्यामुळे मानवी जिवितास हानीकारक झाले आहे असे मा.श्री.संजय सावकरे, विधान सभा सदस्य यांनी सभेत सांगितले व याविषयी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिका-यांनी त्वरीत योग्य ती कार्यवाही करावी असेही सूचीत केले. यावर प्रदुषण नियंत्रण मंडळाचे उपस्थित प्रतिनिधींनी नोंद घेवून आठ दिवसांत कार्यवाही करावी असे आदेश मा.अध्यक्षांनी दिले.

**कार्यवाही - उपप्रादेशिक अधिकारी, म.प्रदुषण नियंत्रण मंडळ,जळगांव.**

यावेळी मा.श्री.शिरिष चौधरी, विधानसभा सदस्य यांनी चर्चेत भाग घेतला तसेच अधिकारी वर्गाने जिल्ह्यात उद्योजकता वाढण्याच्या दृष्टीने उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक भुमिका ठेवावी व उद्योजकांचे प्रश्न त्वरीत कसे निकाली निघतील यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न करावेत असेही सूचीत केले.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून सदस्य-सचिव यांनी मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
प्र.महाव्यवस्थापक,जिउकें
तथा सदस्य-सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती, जळगांव.

सही/-
जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, जळगांव.

(टिपः-स्थळप्रतीवर मा.अध्यक्ष व सदस्य-सचिव यांची स्वाक्षरी असे)